
नोव्हेंबर २०१२ खंड ५ अंक ६
श्री राम चंद्र मिशन®
India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY




# गुरुदेवांसंबंधी अहवाल




दि. १५ ऑगस्ट रोजी मिशनची सर्वसाधारण सभा झाल्यानंतर गुरुदेव चिंतामुक्त झाल्यासारखे वाटत होते, तरीही ते नेहमीप्रमाणे सावधचित्त होते. दि. १६ रोजी त्यांनी कुटीरात असणाऱ्या सर्व अभ्यासींना 'सुवर्ण–पुस्तकात'(गोल्डन बुक) स्वाक्षरी करण्यास सांगितले. हे सुलभतेने होण्यासाठी त्यांनी स्वयंसेवकांच्या प्रमुखांना कुटीरात बोलवून घेतले व त्यांच्या आजू–बाजूच्या अभ्यासींना काहीसे रागावून सुवर्ण–पुस्तकात स्वाक्षरी करण्याची आठवण करुन दिली. यामधून गुरुदेवांची एखाद्या प्रक्रियेला, मग ती कितीही छोटी असो, पूर्ण करण्याविषयीची बांधिलकी दिसून येते.

गुरुदेवांची प्रकृती समाधानकारक नसल्याने ते अत्यंत साध्या दिनचर्येचे पालन करीत आहेत. दररोज सकाळी ते भौतिकोपचार तज्ञाकडून उपचार करून घेतात. भौतिकोपचारांनंतर ते काही वेळ आराम करतात. त्यानंतर नित्याप्रमाणे न्याहारी करून ते वर्तमानपत्रातील बातम्या ऐकतात. नंतर ई–मेल वाचण्यात व इतर कामात त्यांचा वेळ जातो. संध्याकाळी भौतिकोपचाराच्या आणखी एका सत्रानंतर ते कधी–कधी थोडे अंतर चालण्याचा सराव करतात, मग चाकांच्या खुर्चीत बसून एखादी फेरी मारतात किंवा अभ्यासींबरोबर कुटीराबाहेर बसतात. सुरुवातीच्या दिवसात ते वॉकरच्या सहाय्याने चालत होते. मग त्यांनी चालण्याची काठी हातात घेऊन थोडे अंतर चालण्याचा प्रयत्न केला. या सर्व गोष्टी गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये होणारी सावकाश परंतु खात्रीलायक सुधारणा सूचित करतात.

एकदा गुरुदेव 'आपणा सर्वांमध्ये ऐक्य असावे' यावर भर देणारा 'व्हिस्पर्स' संदेश लक्षपूर्वक ऐकत होते. गुरुदेव आपल्या सत्संगांदरम्यानसुद्धा एकोप्याची आवश्यकता व सामंजस्याची गरज अधोरेखित करीत असतात.

दि. २० व २१ ऑगस्ट रोजी गुरुदेवांची विषेश वैद्यकीय तपासणी व इलाज करण्यात आले. त्यांचे निष्कर्ष सकारात्मक होते.

एका दुपारी अचानक गुरुदेवांना अनेक वर्षांपूर्वी पाहिलेल्या एका चित्रपटाची आठवण झाली. त्यांनी युरोप येथे चित्रपट–गृहात जाऊन पाहिलेल्या दोन चित्रपटांपैकी तो एक होता. सॉरबॉन विश्वविद्यालयात गुरुदेवांनी सहजमार्गाविषयी केलेल्या सादरीकरणाच्या दिवशी त्यांनी तो चित्रपट पाहिला होता. 'मनिका–दि गर्ल हू लिव्हड ट्वाइस' हे त्या चित्रपटाचे नाव होते. त्याची कथा पुनर्जन्मावर आधारित होती. गुरुदेव हा चित्रपट पहाताना त्यात पूर्णपणे रंगून गेले होते.


रविवार दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ च्या सुमारास गुरुदेवांनी सुमारे ४५ मिनिटे आश्रमात फेरी मारली. ते म्हणाले, " बाहेर मोकळ्या जागी आल्यामुळे मला पुनर्जन्म झाल्यासारखे वाटत आहे." उपाहार–गृह, स्वयंपाक–गृह तसेच व्यायामाची यंत्रे पाहण्यासाठी वाचनालयाच्या इमारतीतील तळघराला त्यांनी भेट दिली. ध्यान–गृहाच्या दुरुस्तीच्या प्रगतीविषयी चर्चा करण्याकरीता त्यांनी ध्यान–गृहात जाऊन बंधू जॅकी यांची भेट घेतली. आपल्या कुटीराच्या व्हरांड्यामध्ये काही काळ विश्रांती घेतल्यानंतर त्यांनी भोजन–कक्षात जाऊन दुपारचे भोजन घेतले. जवळ–जवळ चार महिन्यांच्या कालावधीनंतर ते त्या ठिकाणी जेवत होते.

एक दिवस भौतिकोपचाराच्या सत्रानंतर गुरुदेव डॉक्टरांबरोबर 'भाषा' या विषयावर संभाषण करीत होते. ते म्हणाले, "मी आधीही एकदा म्हटले होते की माणसाच्या हृदयाकडे जाणारा मार्ग त्याच्या पोटातून जात नाही, तर जिभेतून जातो. जर आपल्याला काही शब्द माहीत असतील आणि जर आपण त्या माणसाच्या भाषेत त्याच्याशी संवाद साधला, तर ते त्याच्या हृदयाला स्पर्शून जाते." यानंतर गुरुदेव अरेबिक भाषेत काही वाक्ये बोलले, त्यामुळे उपस्थितांना अचंबा वाटला. भौतिकोपचारानंतर ते अतिशय थकले होते. ते म्हणाले, "जर आत्ता मला कोणी काही पावलेही टाकावयास सांगितली तर मी निवृत्तच होईन !"

दि. २९ ऑगस्ट रोजी गुरुदेवांच्या ह्रुदय–यंत्रणेची २४ तास चालणारी तपासणी सुरू झाली व निरनिराळे नियंत्रक त्यांच्या छातीवर बसविण्यात आले.आपले रोजचे कार्यक्रम नेहमीप्रमाणे करण्यास त्यांना सांगण्यात







आले. संध्याकाळी आपल्या चाकांच्या खुर्चीमध्ये बसून एक फेरी मारण्याचे गुरुदेवांनी ठरविले. थोडा पाऊस पडण्यास सुरुवात झाल्यामुळे ते परतले व व्हरांड्यामध्ये बसले. वामनावतार व शुक्राचार्य यांची कथा त्यांना आठवली व एका प्रसंगात शुक्राचार्यांनी आपला डोळा कसा गमावला होता त्याबद्दल त्यांनी सांगितले. त्यांच्या समोर बसलेले लोक संगणक–तज्ञ असले तरीही या जुन्या गोष्टी त्यांना माहित नाहीत अशी चेष्टाही त्यांनी केली.

'सतखोल येथील सुवर्ण शांतता' या नावाचा डी.व्ही.डी. स्वरूपातील माहितीपट भगिनी ॲला व बंधू इगोर यांनी तयार केला असून तो त्यांनी गुरुदेवांना अर्पण केला. गुरुदेवांनी तो पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली. अत्यंत उत्कंठतेने गुरुदेव हा माहितीपट पहात असताना सभोवतालच्या वातावरणात झालेल्या बदलामुळे उपस्थितांना सतखोल येथे पोहोचल्यासारखे वाटत होते.

मंगळवार, दि. ११ सप्टेंबर रोजी 'गायत्री'च्या मूळ बांधकामाचा पन्नासावा वर्धापनदिन होता. हा प्रसंग साजरा करण्याची गुरुदेवांची इच्छा होती, परंतु त्यांच्या प्रकृती–अस्वास्थ्यामूळे हे शक्य झाले नाही. एका संभाषणादरम्यान गुरुदेव म्हणाले, "एका पत्नीची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे ती वत्सल असावी, तिला स्वयंपाकाचे ज्ञान असावे आणि ती मुलांची काळजी घेण्यास समर्थ असावी. परंतु हल्लीच्या काळात आपल्याला देखणी पत्नी इ. हवी असते, आणि नंतर इतर लोक तिच्याकडे पाहतात म्हणून आपण मत्सराने ग्रस्त होतो."

एका अभ्यासीने गुरुदेवांना विचारले, 'अभ्यासींच्या भेटी घेणे आणि तुमची विश्रांतीची आवश्यकता यांचा सुवर्ण–मध्य तुम्ही कसा साधता?' यावर पू. गुरुदेव म्हणाले, "मला माझे काम आवडते, आणि जेथे आवड असते, तेथे मर्यादा नसते" त्यानंतर गुरुदेवांनी कान्हा प्रकल्पाच्या चमूबरोबर चर्चा केली व दि. ३० एप्रिल २०१३ च्या समारंभादरम्यान कान्हा हे ठिकाण कसे तयार करावे याबद्दल अनेक सूचना त्यांना दिल्या.

यानंतर ध्यान–गृहामध्ये चाललेल्या कामाची पाहणी करण्यासाठी ते तेथे गेले. तेथून परत येताना निवासकक्ष 'अ' येथे थांबून त्यांनी बंधू राघवन हे विशाखापट्टणमच्या अभ्यासींना देत असलेले भाषण ऐकले.अभ्यासींना १५ मिनिटांची एक छोटी सिटींग देऊन ते कुटीरात परतले.

गुरुदेवांच्या कुटीराचे बांधकाम सुरु करता यावे म्हणून गुरुदेवांनी बंधू माधव रेड्डी यांच्या निवासस्थानी वास्तव्याचा निर्णय घेतला. पू. गुरुदेवांचा तेथे राहण्याचा मूळ उद्देश विश्रांती व प्रकृतीमधील सुधारणा हा होता तरीसुद्धा त्यांच्या भेटीकरीता अभ्यासींचा ओघ अखंड सुरु होता. अभ्यासींना भेटण्याचा ते सर्वतोपरी प्रयत्न करीत होते, परंतु पूर्ण बरे वाटण्यासाठी त्यांना विश्रांती आवश्यक आहे हे सर्वांनीच समजून घेतले पाहिजे.

एका संध्याकाळी गुरुदेव चालण्याच्या काठीच्या मदतीने आपल्या शयनकक्षातून चालत आले. हे गुरुदेवांच्या प्रकृतिमधील सुधारणेचे द्योतक होते. ते काही वेळ बाहेर थांबले व स्वत: व्हीलचेअर चालवत आत गेले. गुरुदेवांची मन:स्थिती उत्तम होती. वेदना व दु:ख याविषयी बोलताना ते म्हणाले की दु:खाचा स्वीकार आपण प्रसन्नपणे केला पाहिजे कारण आपल्या विकासाकरीता व उत्क्रांतीकरीता ते चांगले असते. गुरुदेव म्हणाले की ते काठी घेऊन चालले कारण त्यांना नंतर येणाऱ्या कठिण प्रसंगांमधूनही बाहेर पडायचे आहे.

शनिवार दि. २२ रोजी सकाळी पू. गुरुदेवांची दंत–तपासणी करण्यात आली व त्यानंतर सुमारे ११:३० वा. ते निवासकक्ष 'अ' मध्ये गेले. आंध्रप्रदेशच्या किनारी भागातून आलेल्या अभ्यासींना ते भेटले व त्यांनी 'वेळ वाया न घालविण्याचे महत्व' समजावून सांगणारे छोटेसे भाषण दिले.











त्यानंतर ते एक छोटीशी सिटींग देतील असे त्यांनी उपस्थितांना सांगितले. पू. गुरुदेवांनी त्यांच्या भाषणांत 'आपणांस उपलब्ध वेळेचा उपयोग प्रगतीसाठी करण्याच्या निकडीवर' भर दिला. त्यांनी प्रत्येकाला वाया गेलेला वेळ कधीही परत येत नाही हे लक्षात ठेवण्याची विनंती केली.

असे अनेकदा घडले की पू. गुरुदेव बाहेर सभागृहापर्यंत त्यांच्या काठीच्या सहाय्याने चालत येत असत व अभ्यासी त्यांच्या सभोवताली बसत असत. असेच एकावेळेस अनेक अभ्यासी येऊन त्यांच्या सभोवताली बसले. पू. गुरुदेव खूपच थकलेले व अशक्त दिसत होते परंतु तसे न दर्शवता त्यांनी सिटींग देण्यास सुरुवात केली. सुमारे १५ मिनीटांनंतर त्यांनी 'दॅट्स ऑल' असे म्हणून सिटींग संपवली. त्यानंतर पू. गुरुदेवांनी तुर्कस्थानहून आलेल्या, तुर्कस्थानमधील मिशनबद्दल चांगली बातमी देणाऱ्या एका जोडप्याचे बोलणे शांतपणे ऐकले. यामुळे गुरुदेव उल्हासित झाले.

एका रविवारी सकाळी ज्यावेळी आश्रमामध्ये सत्संग सुरु होता त्याचवेळी पू. गुरुदेवांनी बंधू माधव यांच्या घरी सिटींग दिली. नंतर ज्यावेळी बंधू कमलेश यांनी पू. गुरुदेवांना सांगितले की सत्संग चालू असतांना मध्येच सत्संग जाणिवेच्या एका वेगळ्याच पातळीवर गेला होता, त्यावेळी पू. गुरुदेव म्हणाले की ते ज्यावेळी सत्संगाचे संचालन करीत होते, त्यावेळी केव्हातरी त्यांनी प्रत्येकाला सत्संगामध्ये सामावून घेतले व त्यामुळे तो परिणाम जाणवला.




शुक्रवार दि. २८ सप्टेंबर रोजी बंधू कमलेश यांचा वाढदिवस होता. पू. गुरुदेवांनी सकाळी प्रसाद अर्पण करुन तो सर्वांना वाटला. सांध्याकाळी कोलकाताहून आलेले सगळे अभ्यासी बंधू माधव यांच्या घरासमोर एकत्रित झाले, यावेळी पू. गुरुदेव बाहेर येऊन काही मिनीटांसाठी त्यांच्यासोबत बसले होते. यावेळी जमलेल्या सगळ्या अभ्यासींना पू. गुरुदेवांच्या भेटीमूळे कृत्यकृत्य झाल्यासारखे वाटत होते.

चायनिज चर्चासत्र सुरु होण्यापूर्वी पू. गुरुदेवांसमवेत चायनिज चर्चासत्राच्या आयोजकांची बैठक झाली व त्यांनी संपूर्ण आठवड्यासाठीच्या कार्यक्रमावर विस्तृतपणे चर्चा केली. चीन व सुदूर पूर्वेकडून सुमारे ७० अभ्यासी या चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी आले होते. मंगळवार दि. २ ऑक्टोबर रोजी पू. गुरुदेव चायनिज चर्चासत्रातील अभ्यासींना भेटण्यासाठी निवासकक्ष 'अ' मध्ये गेले व त्यांनी सिटींग तसेच भाषण दिले. त्यांच्या भाषणांत गुरुदेव म्हणाले की माझ्या महाविद्यालयीन विद्यार्थी जीवनापासून मला चिनी संस्कृती व तत्वज्ञानाचे आकर्षण होते व मी ताओ ली चिंग व ॲनेलेक्ट्स ऑफ कन्फ्यूशिअसच्या प्रति मिळविण्यात यश मिळविले होते. मला सगळ्यात जास्त जर कुणी झपाटले असेल तर ते म्हणजे 'आय–चिंग द बुक ऑफ चेंजेस' याने". पुन्हा चीनला जाण्याची इच्छा व्यक्त करताना ते म्हणाले, "जरी मी तुमच्या देशात येऊन एक किंवा दोन ठिकाणी भेट दिली असली, तरीही जर माझ्या गुरुदेवांनी परवानगी दिली तर मी पुन्हा येईन, पण तुम्हाला माहित असेलच की चीन खूप दूर आहे. पण कदाचित कधीतरी मी कोलकत्याला जाऊन काही दिवस विश्रांती घेईन व नंतर कुनमिंगला जाईन. हे सगळे अर्थातच तुम्हाला मी यायला हवे असेल तरच." पू. गुरुदेव पुढे म्हणाले की भारतीय व चिनी लोकांचे प्राचीन संस्कृती, तत्वज्ञान व ऐतिहासीक घटनांमध्ये महत्त्वाचे योगदान आहे. ते म्हणाले की तुम्ही सगळ्यांनी या वृद्ध व्यक्तीला, ज्याला चिनी भाषा येत नाही, त्याला भेटण्यासाठी पुन्हा पुन्हा आले पाहिजे, परंतु माझ्या गुरुदेवांना धन्यवाद की मी तुम्हा सर्वांना भेटण्यासाठी, थोडेफार संभाषण करण्यासाठी आणि ऑक्टोबर २०१३ मधील पुढील चर्चासत्रासाठी आपणा सर्वांना निमंत्रित करण्यासाठी सक्षम आहे.

एका संध्याकाळी रशियातील दोन भगिनी पू. गुरुदेवांना त्या परत जात आहेत हे सांगण्यासाठी व गुरुदेवांनी काही संदेश द्यावा यासाठी भेटावयास आल्या. पू. गुरुदेव म्हणाले "हे बघा, जगामध्ये बदल घडवून आणणे हे आपले काम नाही. ते वैश्विक कार्य आहे. परंतु आपण येथे एक एक करुन एकत्र आणू शकतो–म्हणजे बघा निर्मळ हृदय, प्रेमळ हृदय व सावकाशपणे सर्वकाही बदलेल. जर तुम्ही तळ्यामध्ये दगड टाकलात तर पाण्यावर दूरपर्यंत तरंग उठतात. आपण आपले काम लहान आहे की मोठे याचा विचार करु नये. आपण फक्त कार्य केले पाहिजे. मी अनेकवेळा बाबूजी महाराजांना विचारत असे की बाबूजी आपण एवढे कार्य करीत आहोत, याचे परिणाम मिळतील काय? आणि बाबूजी म्हणत हा प्रश्न कधीही विचारु नकोस. तर आपण परिणामाचा विचार करीत नाही, तर कार्य करा आणि विश्वास असू द्या की फळ हे मिळेलच."

# मणपाक्कम येथील संमेलन






## दि. ४ ते ९ सप्टेंबर, २०१२

अलाहाबाद केंद्राचे सुमारे ६३० अभ्यासी या संमेलनामध्ये सहभागी होण्यास आले होते. नियमित सत्संग, बैठका व या संमेलनादरम्यान झालेल्या इतर कार्यक्रमांव्यतिरिक्त अभ्यासींना गुरुदेवांना दोन वेळा भेटण्याची संधीही मिळाली. सर्व अभ्यासी शिस्तबद्धरित्या गुरुदेवांच्या निवासस्थानाच्या बाहेर उभे होते व गुरुदेव दोन दिवस संध्याकाळी आपल्या व्हीलचेअर मध्ये बसून कुटीराबाहेर आले व ते अभ्यासींना भेटले. गुरुदेव १०–१५ मिनिटे अभ्यासींसमवेत बसले होते व त्या दरम्यान निशब्द शांतता पाळली गेली.

## दि. ११ ते १६ सप्टेंबर,२०१२

या आठवड्यात विशाखापट्टणम व दाचेपळ्ळी केंद्राच्या अभ्यासींनी आश्रमाला भेट दिली व या ठिकाणी उपस्थित अभ्यासींची संख्या सुमारे ५३० होती. या संमेलनाचा एक भाग म्हणून गुरुदेव निवासकक्ष 'अ' येथे एकदा आले व त्यांनी एक छोटेसे भाषणही दिले.

## दि. १८ ते २३ सप्टेंबर,२०१२

किनारी भागातल्या आंध्रप्रदेशासमवेत पूर्व व पश्चिम गोदावरि व काकिनाडा केंद्राच्या अभ्यासींसाठी हे संमेलन होते. एकंदर ४३० अभ्यासी यामध्ये सामील झाले होते. दि. २२ रोजी गुरुदेव सर्व अभ्यासींना भेटले, त्यांनी सत्संग संचालित केला व एक छोटेसे भाषणही दिले. नियमित सत्संगाव्यतिरिक्त रोज भाषणे व इतर कार्यक्रम आयोजित केले गेले होते. या सर्वांमध्ये अभ्यासींनी भाग घेतला.

## दि. २५ ते ३० सप्टेंबर, २०१२


कोलकाता, प. बंगालमधील अन्य केंद्रे तसेच सिक्किम व त्रिपुरा केंद्राच्या अभ्यासींनी एकत्रितपणे या संमेलनामध्ये भाग घेतला. बंधू कमलेश पटेल हे या संमेलनामध्ये व इतर सर्व संमेलनांमध्ये अतिशय सक्रीयतेने सहभागी झाले होते. त्यांनी बरीच भाषणे दिली. आपल्या भाषणादरम्यान त्यांनी 'गुरुदेवांशी भौतिक जवळीक साधण्याच्या प्रयत्नात त्यांना त्रास न देता गुरुदेवांच्या आंतरिक अस्तित्वाकडे अधिक लक्ष द्यावे व गुरुदेव आपल्यासाठी आध्यात्मिक स्तरावर जे काही करतात ते आत्मसात करून ती आध्यात्मिक स्थिती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करावा' यावर भर दिला. गुरुदेवांनी सर्व अभ्यासींना भेटण्याचे ठरविले होते. परंतु, आश्रमाबाहेर रस्त्याचे काही काम सुरु असल्याने ते येऊ शकले नाहीत. त्याऐवजी ते त्या सर्वांना बंधू माधव यांच्या निवासस्थानीच भेटले. एके दिवशी कलकत्त्याचे सर्व अभ्यासी गुरुदेवांना भेटायला गेले. दुसऱ्या एका दिवशी सिक्किमचे सर्व अभ्यासी गुरुदेवाची भेट घेण्याकरीता गेले. अशा प्रकारे गुरुदेवांनी फक्त आध्यात्मिक कार्यच केले असे नाही तर सर्व अभ्यासींना भेटण्यासाठी अतिरिक्त कष्टही घेतले. सुमारे ४६० अभ्यासींचा समुदाय या संमेलनासाठी जमला होता. सर्वत्र दिसणाऱ्या अभ्यासींमुळे आश्रमाचे वातावरण चैतन्यपूर्ण झाल्याचे जाणवत होते.

## दि.२ ते ७ ऑक्टोबर, २०१२

चीन व सुदूर पूर्वेकडील देशांचे सुमारे ७० अभ्यासी या संमेलनामध्ये सामील होण्यासाठी आले होते. आश्रमामध्ये सुरु असलेल्या सर्व घडामोडी व कार्यक्रमांबद्दल गुरुदेवांना वेळोवेळी माहिती पुरविण्यात येत होती व जेव्हा गरज असेल तेव्हा गुरुदेव मार्गदर्शनही करीत होते.









## दि. ९ ते १४ ऑक्टोबर, २०१२

सुमारे ५३० अभ्यासींना बाबूजी मेमोरियल आश्रम, चेन्नई येथे पू. गुरुदेवांच्या छत्रछायेखाली दिव्य वातावरणाचा आनंद लुटण्याचा लाभ मिळाला. प्रत्येक जण रोजच्या प्रभावशाली अशा सत्संगांनी ओतप्रोत न्हाऊन निघाला होता. धीर–गंभीर वातावरण, स्वयंसेवकांचे कामाप्रति समर्पण, डोळे उघडणारी भाषणे, आणि आश्रमातील नि:शब्दता हे सगळे स्तिमित करणारे होते. प्रत्येकास आपणास अजून पुष्कळ मिळावे असे वाटत होते.

गुरुदेव सभागृहात आले आणि त्यांनी भाषण दिले. त्यांच्या उपस्थितीने सर्वांना आश्चर्याचा सुखद असा धक्का बसला. आणखी एक अनपेक्षित गोष्ट म्हणजे बंधू कमलेश यांच्या समवेत त्यांच्या कार्यालयात घालवलेला वेळ. तिथे प्रेमाची जणू नदीच वहात होती.

सर्वांना एका आठवड्याचा कालावधी खरे तर खूप कमी वाटला. जे काही या दरम्यान मिळाले ते युगानुयुगे आमच्या समवेत राहील. त्यांनी प्रदान केलेली स्थिती टिकविणे ही आता आमची जबाबदारी आहे. जीवनाला पोषक, फलदायी असा हा प्रवास यापेक्षा अधिक चांगला होणे अशक्य होते.



## ई–समन्वयक सेवा केंद्र , लखनौ

ज्या अभ्यासींना इंटरनेट कसे वापरावे याविषयी माहिती नाही अशा अभ्यासींसाठी लखनौ केंद्राने ई– समन्वयक सेवा केंद्राची सुरुवात केली आहे. या सेवा केंद्रामध्ये अभ्यासींना ई–मेल पाठविणे, मिशनचे संकेतस्थळ (वेबसाईट) पाहणे, डेली रिफ्लेक्शन, व्हिस्पर्स फ्रॉम ब्राईटर वर्ल्ड, सहज संदेश वाचणे, ऑनलाईन अर्ज करणे इ. सुविधा कशा वापराव्यात हे शिकविण्यात येते. यामुळे अभ्यासींना नुकतीच दिली गेलेली भाषणे, ताज्या घडामोडी इ. गोष्टी ई–मेलद्वारे ताबडतोब कळण्यास मदत होते.

## मंगळूर आश्रम जमीन



मंगळूरपासून १८ कि.मी. अंतरावर मंगळूर–बंगळूर महामार्गावर असणाऱ्या बंटवाल तालुक्यामध्ये १२ एकर जमीन खरेदी केल्यामुळे मंगळूर येथील अभ्यासींचा ध्यानासाठी लागणाऱ्या कायमच्या जागेचा प्रश्न मार्गी लागला. ही जागा हमरस्त्यापासून ५ कि.मी. अंतरावर असून कॅनरा इंजिनियरींग कॉलेजच्या अगदी समोर आहे. ४ एकर जागेवर आश्रम बांधण्यात येणार असून ८ एकर जागा अभ्यासींच्या रहिवासी वसाहतीसाठी देण्यात आली आहे.

दि. १९ सप्टेंबर २०१२ रोजी बांधकामाला सुरूवात करण्याआधी सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुरुदेवांनी सर्वांना आशीर्वाद दिला. बंधू कमलेश पटेल यांनी अभ्यासींना आदल्या दिवशीही ध्यान करून मने निर्मळ करण्याचा सल्ला दिला. मंगळूर, पुत्तूर आणि मैसूर येथील ५० अभ्यासी यात सहभागी झाले होते. संपूर्ण वातावरण गुरुदेवांच्या कृपाप्रसादाने भरून गेले होते. सत्संगानंतर बंधू प्रसाद कृष्णा यांनी 'सहजमार्गाची तत्त्वे भाग १५' मधील पू. गुरुदेवांचा संदेश वाचून दाखविला. त्यानंतर त्यांनी बंधू सुब्रया, बंधू राधाकृष्णा, बंधू आण्णाजी राव इत्यादिंनी केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल उपस्थितांना सांगितले व त्यांचे गुणगान केले. भगिनी नलिनींनीसुद्धा यावेळी उपस्थितांना संबोधित केले. स्व. बंधू सरनाड यांनी लिहिलेले भजन भगिनी वाणजक्षी यांनी गायले. सत्संगानंतर ताबडतोब रस्ते बांधणीचे आणि आराखडा तयार करण्याचे काम चालू झाले. सत्संगासाठी तात्पुरत्या ध्यानकक्षाची उभारणी थोड्याच दिवसात करण्यात येणार आहे.

# युवा कार्यक्रम

## युवा कार्यक्रम, कोलकाता

दि. १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी बाबूजी मेमोरियल आश्रमामध्ये सुमारे २५ अभ्यासी जमले होते. सत्संग आणि न्याहारी झाल्यानंतर त्यांनी 'साधनेचा पक्का पाया' या प्रशिक्षण कार्यक्रमामधील 'प्रार्थना' या घटकावर घेण्यात आलेल्या चर्चासत्रामध्ये भाग घेतला. या चर्चासत्राच्या समन्वयक भगिनी लीला दवे या होत्या. प्रत्येक अभ्यासीने प्रार्थनेच्या सखोल अर्थाची जाणीव झाल्याचे सांगितले. सायंकाळी पू. गुरुदेवांनी 'सेवा' या विषयावर दिलेली दोन भाषणे ऐकविण्यात आली.

दि. १५ रोजी 'अभ्यासीच्या जीवनातील तीन 'एम' चे महत्त्व' या विषयावर सहा प्रश्नांच्या अनुषंगाने आत्मपरीक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र म्हणजे केवळ स्वतःचे मूल्यमापन करण्याची संधी न राहता आपापल्या प्रामाणिक अनुभवांची देवाण–घेवाण करण्याचे प्रेरणादायी सत्र वाटले.

दुपारी क्रेस्ट–खरगपूर येथील एक चित्रफीत दाखविण्यात आली आणि पुढील युवा कार्यशाळेमध्ये भाग घेण्यासाठी अभ्यासींना प्रोत्साहित करण्यात आले. यानंतर गुरुदेवांचे 'सेवा' या विषयावर आणखी एक भाषण ऐकविण्यात आले.

या दोन दिवसांच्या वास्तव्यामध्ये युवकांना त्यांची साधना नियमितपणे आणि योग्य वेळी करून शिस्तबद्ध आयुष्य जगण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. सायंकाळी ४ च्या सत्संगानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली. युवा अभ्यासी आश्रमात दोन दिवस राहिले. स्वयंपाकघरातील स्वयंसेवक, आश्रम व्यवस्थापकही त्यांच्यामध्ये सामील झाले होते त्यामुळे अभ्यासींमध्ये विशेष बंध निर्माण झाले.

## अहमदनगर केंद्र ,महाराष्ट्र

दि. २६ ऑगस्ट रोजी येथे एका युवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १८ ते ३५ वयोगटातील ८ अभ्यासींनी यात भाग घेतला. युवा अभ्यासींच्या क्रियाशील सहभागाच्या माध्यमातून या केंद्राच्या विकासाकरीता प्रयत्न करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. कार्यक्रमाची सुरुवात भजनाने झाली व नंतर 'संस्कारांचे कार्य' या विषयी एक नाटक सादर करण्यात आले. 'सहज मार्ग जाणू इच्छिणाऱ्या अभ्यासींना कसे स्पष्टीकरण द्यावे' व 'आध्यात्मिक आणि भौतिक जीवन यात संतुलन कसे राखावे' या विषयावर भाषणे आणि चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी 'युरोपीय युवा सेमिनारची' चित्रफीत दाखविण्यात आली. सर्व अभ्यासींनी यात उत्साहाने व हिरीरीने भाग घेतला. हा परस्परसंवादी कार्यक्रम प्रभावीपणे पार पडला.




## वैश्विक युवा नेटवर्क

सहज मार्गातील युवकांचे एकसंघ असे जाळे निर्माण व्हावे या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. इंटरनेट हा याचा प्रारंभ असणे हे साहजिकच आहे. अभ्यासींनी एकमेकांना जोडावे व सायबर सभांमध्ये भाग घ्यावा याकरीता इंटरनेटच्या माध्यमातून चर्चासत्रे (वेबिनार) आयोजित केली गेली. सहज मार्गाच्या उपक्रमांबद्दल सर्वांना माहिती देणे व प्रकल्पांकरीता मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवक चटकन गोळा करणे यासाठी या नेटवर्कचा उपयोग होऊ शकेल.

युवा अभ्यासी हे सर्वसाधारणपणे अविवाहित किंवा नुकतेच लग्न झालेले असतात. बरेच जण शिकत असतात किंवा करीयरची सुरुवात करणारे असतात. आयुष्य हे बरेच आडवळणे घेणारे, व्यग्र असते. प्रलोभनांनी व महत्त्वाकांक्षांनी भरलेले असते. हाच काळ असतो जेव्हा साधना ही खूप महत्त्वाची ठरते. पण ती बऱ्याचदा दुर्लक्षिली जाते.

दि. २९ जून रोजी पहिल्या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. बंधू बिल वेकॉट यांनी युवकांना मिशनच्या कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. बंधू संतोष खांजी यांनी साधनेमधील शिस्तीचे महत्त्व विषद केले.

दि.२५ ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा कॅलिफोर्निया, ऑस्ट्रेलिया, लॅटिन अमेरिका, युरोप, मध्य–पूर्व आणि भारतातून सर्वजण पुन्हा ऑनलाईन जमले होते. प्रोत्साहित करणारे आणि सुंदर असे सादरीकरण यामुळे वातावरणात प्रेम भरून राहिले होते. ते प्रेम सीमा व काळ यांच्या पलिकडले होते.

याविषयीच्या बातम्या व उपक्रमांच्या माहितीविषयी खालिल पत्त्यावर नोंदणी करावी :
https://docs.google.com/spreadsheet/viewform?formkey=dE8wRmdCR2txVkNlcXAtTmNCX2d3UHc6MA#gid=0

## सहज सहल, भिलवाडा, राजस्थान

दि.२९ सप्टेंबर रोजी हरिणी महादेव या पर्यटनस्थळी २२ युवक आणि अभ्यासींची मुले जमली होती. 'सिंहाचे हृदय' या विषयावर ठेवण्यात आलेल्या चर्चासत्रात नेतृत्व–गुण व भीतीचा अभाव या विषयांबद्दल चर्चा झाली. या विषयांच्या अनुषंगाने प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही ठेवण्यात आला होता. यामध्ये सहभागींनी दिलेली उत्तरे गुरुदेवांनी त्या विषयावर सांगितलेल्या कथांबरोबर ताडून पाहण्यात येत होती. तीन समूहांनी न बोलता एकमेकांशी संवाद साधण्याचा खेळ मनोरंजक होता. ही सहल सर्वांनाच खूप आवडली.



## एन. एस. एस. शिबीर,डायमंड जुबिली पार्क, तिरुप्पूर



दि.२३ ते २९ सप्टेंबर दरम्यान तिरुप्पूर येथील नंज्जपा कॉर्पोरेशन हायस्कूल आणि के.एस.सी. गर्व्हनमेंट हायस्कूलच्या सहयोगाने डायमंड जुबिली पार्क, तिरुप्पूर, येथे एस.आर.सी.एम.द्वारा ६० विद्यार्थ्यांसाठी एन.एस.एस. शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

दि.२३ रोजी संध्याकाळी दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक आणि विविध शाळांचे शिक्षक उद्घाटनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. अनेकविध समाजसेवी संस्थांमधून आलेल्या अतिथींनी तसेच अभ्यासींनी वाहतूक–सुरक्षा, प्लास्टिकचा वापर टाळणे, डेंग्युताप, प्रथमोपचार, वृक्षारोपण आदि विषयांवर जागृती निर्माण करणारे कार्यक्रम सादर केले. सायंकालीन सत्रात प्रश्नमंजुषा, 'विवेकानंथर आणि अध्यात्म' या विषयावर भाषण आणि निसर्गाच्या संवर्धनाविषयक एक लघुपट इत्यादिंचा समावेश होता.

दि. २९ रोजी पंचायत अध्यक्ष पलनीसामी यांनी निरोपाचे भाषण केले आणि दक्षिण तिरुप्पुरचे डि.एस.पी. राजाराम यांनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित केली. दोन्ही शाळांचे विद्यार्थी आणि शिक्षक यांचे ७ दिवस डि.जे. पार्क येथे वास्तव्य होते. डि. जे. पार्कला भेट देणाऱ्या सर्वांनाही आपल्या गुरुदेवांची आणि सहजमार्ग साधना पद्धतीची माहिती करुन देण्याची ही उत्तम संधी होती.

## मदुराई आश्रम येथील आध्यात्मिक चर्चासत्र

दि. २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान ३ दिवसाचे चर्चासत्र आयोजित करण्यासाठी प्रादेशिक समन्वयक बंधू एन. प्रकाश आणि विभाग–प्रमुख बंधू टी. व्ही. विश्वनाथ यांनी मदुराई आश्रमाला भेट दिली. मदुराई आणि लगतच्या केंद्रातून सुमारे ६२५ अभ्यासी यामध्ये सहभागी झाले होते.

दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५:१५ वा.च्या सत्संगाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. रात्रीचे जेवण आणि वैश्विक प्रार्थनेनंतर रात्री ९.१५ वाजता बंधू एन. प्रकाश यांनी सत्संग संचालित केला. या कार्यक्रमाचे स्वरुप स्पष्ट करताना ते म्हणाले की हे एक अत्यंत सघन असे आध्यात्मिक चर्चासत्र आहे, दोन सत्संगाच्या मधल्या अवधीत शक्य असेल तितक्या वेळा ध्यान करावे किंवा पुस्तकांचे वाचन करावे अथवा शांतता राखावी. आपल्या हृदयात खोलवर डोकावून, गुरुदेवांची कृपा आणि प्राणाहुती आत्मसात करावी. आत्मपरिक्षण करावे आणि स्वत:मधील गुरुदेवांचे अस्तित्व अनुभवावे.

अभ्यासींना त्यांची आंतरीक स्थिती आणि बदल दैनंदिनीमध्ये नोंदविण्याची विनंती करण्यात आली. दैनंदिनी लिहिण्याचे महत्त्व आणि 'ध्यानापूर्वी आणि पश्चात आंतरीक स्थितीत होणारे बदल' समजून घेण्यासाठी काही सूचना असलेले माहितीपत्रक सर्व सहभागींना वितरीत करण्यात आले.

दि.२९ रोजी चार सत्संग संचालित करण्यात आले. प्रत्येक सत्संगानंतर बंधू प्रकाश यांनी 'व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड' मधील संदेशांचे वाचन केले. रविवार दि. ३० रोजी सकाळी ७.३० व ११.३० वाजता बंधू प्रकाश यांनी सत्संगाचे संचालन केले. सत्संगानंतर बंधू राव यांनी अभ्यासींना स्वत:च्या प्रगतीसाठी ह्या चर्चासत्राचा उपयोग होईल असे प्रतिपादन केले. गुरुदेवांच्या इच्छेप्रमाणे अभ्यासींनी प्रेम, शांती आणि ऐक्य यांचे वाहक बनले पाहिजे असे बंधू प्रकाश म्हणाले.

## तामिळनाडू राज्याच्या विभागप्रमुखांचा दक्षिण भागातील दौरा



दि.२२ ते २६ ऑगस्ट दरम्यान तामिळनाडू राज्याचे विभागप्रमुख बंधू टी.व्ही. विश्वनाथ यांनी दक्षिण भागातील तिरुनेल्वेलि आणि तूतुकुडि या जिल्ह्यांचा दौरा केला. त्यांनी छिन्नवल्लिक्कुलम,सिवकासि,कोविल्पट्टि, तिरुनेल्वेलि, तूतुकुडि, चेरन्महादेवि, वळ्ळियूर, कलक्काड, कोटैक्करुन्गुळम, वडक्कन्कुळम या केंद्राना भेटी दिल्या. सत्तुर आणि अलमरथ्थुपट्टि या कमी अभ्यासी असलेल्या नविन केंद्रांचे उद्घाटन केले.

तूतुकुडि येथे बंधू राव यांनी 'नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन' आणि 'होली क्रॉस होम सायन्स कॉलेज' येथील खुल्या सत्रांमध्येभाषण केले. समूगरेंगपुरम आणि मुक्कूडल येथेही खुली सत्रे आयोजित करण्यात आली. तामिळनाडुच्या या दौऱ्यादरम्यान पुष्कळ ठिकाणी मुमूक्षूंना प्राथमिक सिटींग देण्यात आली, परिणामी या भागात मिशनच्या उपक्रमांना चालना मिळाली.

# प्रशिक्षण कार्यक्रम

## प्रकाशन कार्यशाळा–मंगलोर,कर्नाटक



मंगलोर केंद्रामधील सुमारे ५८ अभ्यासींसाठी 'मिशनचे साहित्य वाचण्यातील आनंद आणि अनुभवांची देवाण–घेवाण' या विषयावरील संपूर्ण दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये वाचनाचे महत्त्व, वाचन का करावे, वाचनामुळे होणारे आध्यात्मिक लाभ, कुठल्या मनोवृत्तीने वाचन करावयास हवे, आध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी पुस्तकाद्वारे होणारे मार्गदर्शन यांचा समावेश होता. या सादरीकरणाच्या दरम्यान गुरुदेवांच्या भाषणांच्या ध्वनि व चित्रफीतींची माहितीपूर्ण व उद्बोधक कात्रणे प्रस्तुत करण्यात आली. सत्संगानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## प्रशिक्षक परिसंवाद, केरळ.

दि. २३ सप्टेंबर रोजी तलश्शेरि येथे, केंद्राच्या उन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या तसेच पूर्ण दिवसीय कार्यक्रमांच्या क्रियात्मक पैलूंवर चर्चा करण्यासाठी उत्तर मलबार केंद्रामधील प्रशिक्षक एकत्र आले होते. पूर्ण दिवसीय कार्यक्रमादरम्यान ठरविलेल्या विषयापासून विचलित होऊ नये तसेच सर्व अभ्यासींना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळावी आणि शक्यतोवर सहजमार्ग साहित्यामधील उदाहरणेच उद्धृत केली जावीत असे ठरले. दि. २३ ऑक्टोबर रोजी 'व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड' मधील संदेशावर आधारीत संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले.

## प्रकाशन उपक्रमात वृद्धी, मैसूर

मैसूर येथे दि. १ आणि २ सप्टेंबर रोजी प्रकाशन उपक्रमातील स्वयंसेवकासाठी जिल्हापातळीवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये १५ केंद्रांमधून ४३ अभ्यासी सहभागी झाले होते. 'साधना– कुशल स्वयंसेवेचा पाया' या सत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वयंसेवक , वस्तू, पायाभूत सुविधा, विक्री आणि वितरण या प्रकाशन उपक्रमामधील विविध भागांविषयी विस्तृत चर्चा झाली. 'स्वयंसेवकांनी मिशनचे साहित्य वाचणे महत्त्वाचे आहे' हे प्रामुख्याने सांगण्यात आले. प्रत्येक जिल्ह्याकरीता आराखडा आणि मार्गदर्शक सूचना या विषयांवर मतांची देवाण–घेवाण करण्यात आली. जिल्हासमन्वयकांनी सर्वांच्या सोयीसाठी आराखडा प्रस्तुत केला.



## 'अवलोकन'–बेंगलोर, कर्नाटक

दि. ८ ते ९ सप्टेंबर रोजी बेंगलोर येथील बनशंकरी आश्रमामध्ये कन्नड भाषेमधून प्रगत अशा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुमारे १७५ अभ्यासी सहभागी झाले होते. अभ्यासींनी आत्मचिंतन करावे आणि त्यांना सहजमार्गातील उद्दिष्ट आणि सखोल संकल्पना समजाव्यात हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. सहज मार्गातील तत्वज्ञान, सहजमार्ग साधनेचे सूक्ष्म पैलू, सहजमार्ग हाच जीवनाचा मार्ग, आपल्या उत्क्रांतीमध्ये गुरुदेवांची भूमिका, त्यांच्यासमवेत आपले नाते, आध्यात्मिक प्रवासामधील प्रेमस्वरूपी टप्पे, प्रगती, परिवर्तन, आत्मपरिक्षण हे या कार्यक्रमातील चर्चेचे विषय होते. सर्वांचा सहभाग निश्चित करण्यासाठी प्रश्नोत्तरांचे सत्र घेण्यात आले आणि 'गुरुदेवांच्या उक्तींचे आध्यात्मिक दृष्टिकोनामधून अर्थ' यावर स्पष्टीकरण देण्यास अभ्यासींना सांगण्यात आले.

## कन्नड अनुवाद प्रशिक्षण कार्यक्रम



कन्नड भाषेमध्ये अनुवाद प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दोन भागांत करण्यात आले. दि. १७ जून रोजी प्रथम आणि दि.५ ऑगस्ट रोजी द्वितीय सत्र झाले. इच्छुक अभ्यासींना गुरुदेवांची भाषणे, पुस्तके, आणि चित्रफितीतील उपशीर्षके इत्यादिंचे इंग्रजीमधून कन्नड भाषेत अनुवाद करता यावा यासाठीचे प्रशिक्षण देणे, अनुवादकांची संख्या वाढावी तसेच मर्यादित कालावधीत उत्तम दर्जाचे काम व्हावे हे कार्यक्रमाचे उद्दीष्ट होते. बंधू राम शास्त्री आणि बंधू सुब्रमण्या बी.जी. यांनी सहभागी झालेल्या१७ अभ्यासींसाठी कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या भागात प्रशिक्षणार्थींना सहजमार्ग साहित्यातील इंग्रजीमधील काही परिच्छेद देण्यात आले आणि आपले भाषांतर सादर करण्यास सांगण्यात आले. दुसऱ्या भागात अक्रमिक पद्धतीने निवडलेल्या भाषांतराचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. त्यामधील सकारात्मक वैशिष्ट्ये आणि काही कमतरता असणाऱ्या भागांवर चर्चा करण्यात आली. भाषांतरासाठी आणि त्रैमासिकामधल्या लेखनासाठी त्यांना काही सूचना देण्यात आल्या. प्रशिक्षणार्थींना कार्यक्रम खूप उपयुक्त आणि वस्तुनिष्ठ वाटला.

# मार्ग दर्शविताना




## अहमदाबाद, गुजरात

नव्यानेच हाती घेतलेल्या उपक्रमाचा भाग म्हणून केंद्रप्रमुख बंधू जिग्नेश शेलाट यांनी 'जीवनाच्या खऱ्या ध्येयाचे आकलन' या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी अहमदाबाद आश्रम येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आमंत्रित केले होते. दि. ७ ऑगस्ट, २०१२ रोजी झालेल्या या कार्यशाळेस आठ संस्थांमधील सुमारे ६७ विद्यार्थी हजर होते. कार्यक्रमाची सुरुवात एका सादरीकरणाने झाली त्यानंतर उपस्थितांना पाच विषयांवरील गटचर्चेत सक्रीय सहभाग घेण्यात सांगण्यात आले. कार्यशाळेचा सारांश देताना सहजमार्गातील ध्यान पध्दतीची माहिती देण्यात आली. बऱ्याच विद्यार्थांनी ही पध्दति अवलंबण्यात रुचि दाखवली. संपूर्ण कार्यशाळेदरम्यान प्रिय गुरुदेवांची कृपा जाणवत होती.

## तिरुवनन्तपुरम, केरळ

इन्फोसीस व अर्नेस्ट ॲन्ड यंग या कंपन्यांच्या मनुष्यबळ विभागाच्या आमंत्रणानुसार त्या कंपन्यांमधे तीन खुल्या सत्रांचे आयोजन करण्यात आले. दि. ९ व १३ ऑगस्ट रोजी इन्फोसीसच्या टेक्नोपार्क आवारात व दि. ६ सप्टेंबर रोजी अर्नेस्ट ॲन्ड यंग येथे हे कार्यक्रम पार पडले. दोन्ही कंपन्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना एक आठवडा आधीच अधिकृत आमंत्रणे पाठवली होती. ध्यानामुळे आपल्या कामात व जीवनात कसे संतुलन येते, आंतरिक शांती व संतुलन निर्माण होते आणि ध्यानामुळे प्रत्येकाचे खरे परिवर्तन कसे सुलभतेने होते या चर्चेने या सत्राची सुरवात झाली. त्यानंतर ध्यानाचे उद्दिष्ट, हृदयावरील ध्यान, मार्गदर्शकाची गरज तसेच एस. आर. सी. एम. चे सर्व कार्यक्रम यांचा ओझरता उल्लेख करण्यात आला. उत्सुक सहभागींनी कुतूहलाने विचारलेल्या प्रश्नांमुळे सत्र मधे मधे खंडीत होत होते.

## लाम्डिंग , आसाम

दि. १ सप्टेंबर रोजी आसाम मधील गुवाहाटी जवळील लाम्डिंग या छोट्याशा ठिकाणी खुले सत्र आयोजीत करण्यात आले होते. जेथे सहजमार्गास कोणतीच पूर्वपीठीका नाही अशा ठिकाणी हे खुले सत्र आयोजित करण्यासाठी बंधु अविजीत डे यांनी कठोर परिश्रम घेतले. विद्यार्थी, शिक्षक, वकील, उद्योजक इ. असलेल्या या ३४ उत्साही इच्छुकांच्या संमेलनात बंधू अशोक सेनगुप्ता यांनी व्याख्यान दिले.



त्यांनी मानवी जीवनातील ध्यानाचे स्थान अधोरेखित केले. सहभागींमधे जास्त करून बंगाली भाषिक असल्यामुळे सत्र बंगाली भाषेत आयोजित करण्यात आले होते. विभाग प्रमुख बंधू धनीचंद व बंधू राजू शर्मा हे देखील उपस्थित होते. एकूण १४ इच्छुक अभ्यासी बनले व इतर ५ व्यक्ति साधनेची सुरुवात येत्या सप्ताहात करतील असे अपेक्षित आहे.

## प्रोड्डुत्तूरु, आंध्रप्रदेश

दि. १ सप्टेंबर रोजी प्रोड्डुत्तूरु, जिल्हा काडापा येथील 'रायल सीमा थर्मल पावर प्लांट' मधील अभियंत्यांच्या संघटनेच्या आमंत्रणानुसार सुमारे १५० अभियंता– कर्मचाऱ्यांसाठी खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. बंधू टी. बिक्षम यांनी सहजमार्गातील ध्यानाची प्रक्रिया, ध्यानाचे महत्व व या प्रणाली मधील ठळक बाबींवर प्रकाश टाकणारे भाषण केले. यावेळी सहभागी लोक खरोखरच हेलावले, प्रभावित झाले आणि त्यामधील ३५ जणांनी साधनेची सुरवात केली.

त्याच दिवशी जवळपासच्या केंद्रातील सर्व अभ्यासींच्या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रोड्डुत्तूरु जरी छोटेसे केंद्र असले तरी विभाग प्रमुख बंधू एम. आर. गंगाधर व बंधू बिक्षम यांनी संचालित केलेल्या कार्यक्रमास ३०० अभ्यासी उपस्थित होते.

## श्रीनगर, जम्मु व काश्मीर

दि. १ सप्टेंबर रोजी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या आवारात कें.रा.पो.द. मधील अधिकाऱ्यांच्या पत्नींसाठी खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. बंधू संदीप दत्ता, डी.आय.जी., व त्यांच्या पत्नी भगिनी रजनी दत्ता यांनी २० सहभागींसाठी शरीर व मनाच्या समन्वयाच्या मूल्यांकनाच्या सरावाचे संचालन केले. भगिनी चंद्रकांता व भगिनी रजनी दत्ता यांनी 'सुखी परिवार, स्त्रीची जवाबदारी' या विषयावर आधारीत सादरीकरण केले. मानवी मनातील मुलभूत भीती व अस्वस्थतेपासून सुरुवात करुन अंतरंगातील उच्चतम स्वयम म्हणजेच आपल्या अंतरंगातील अथांग शांततेपर्यंत पोहोचणे, याद्वारे अंतर्गत परिवर्तनाचा प्रवास सादर करण्यात आला.





अनेक जण साधनेची सुरुवात करण्यास उत्सुक होते. त्यांच्या लक्षात आले की त्यांची वर्तणूक त्यांच्यातील आंतरीक मूल्यांपासून उत्पन्न होते, जी त्यांची मुले वर्तणूकीची आदर्श भूमिका म्हणून स्वीकारतात.

दि. २ सप्टेंबर रोजी ८२वी बटालीयन, के. रा. पो. दल, श्रीनगर येथील अधिकारी व जवानांसाठी अशाच प्रकारचा मेळावा आयोजित केला गेला.

## मंगलोर, कर्नाटक

दि. १४ सप्टेंबर रोजी श्रीनिवास इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मधील एम. बी. ए. च्या प्रथम तसेच अंतिम वर्गातील विद्यार्थी, प्रथम वर्ष बी. एड. चे विद्यार्थी व कर्मचारी वर्ग अशा सुमारे २०० जणांसाठी खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. बंधू प्रसाद कृष्णा यांनी सहज मार्गावर भाष्य केले. महाविद्यालयातील प्राचार्य व उप-प्राचार्यांसहीत सहभागींनी ध्यानाच्या पद्धतीबद्दल अनेक कुतूहलपूर्ण प्रश्न विचारले. अनेक विद्यार्थ्यांनी माहितीपुस्तिका घेतली व काही जणांनी साधनेची सुरुवात करण्यासाठी उत्सुकता दर्शविली.

## नेल्लूर, आंध्रप्रदेश

दि. २१ सप्टेंबर २०१२ रोजी आंतरराष्ट्रीय शांतीदिनानिमित्त नारायण कॉलेज ऑफ फार्मसी, नेल्लूर मधील विद्यार्थी, शिक्षक व व्यवस्थापन यांच्यासाठी 'मूल्याधारित आध्यात्मिक शिक्षण' व 'ध्यानाचे महत्व' या संबंधी माहिती देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मानवी मूल्यांवर भाष्य करताना भगिनी उमा गंगाधर यांनी आपल्या समाजात कुटुंबातील सदस्यांवरील प्रेम व आपुलकी यातील वृध्दी, दयाळूपणा, देण्याची मनोवृत्ती, सुखदु:खातील सहभाग इत्यादिंमध्ये वाढ होण्याची गरज व्यक्त केली. बंधू गंगाप्रसाद यांनी ध्यानामुळे एकाग्रतेमध्ये सुधारणा व मनुष्यांमधील आध्यात्मिक सामर्थ्य जागृत कसे होते हे विषद केले. बंधू वीरभद्र राव व चक्का गोपीनाथ, प्राचार्य, यांनी मूल्ये व ध्यानाने मन कसे निश्चल व शांत होते यावर काही अधिक मुद्दे सांगून सत्राचा समारोप केला. हा कार्यक्रम विद्यार्थी व शिक्षकांनी योग्यप्रकारे ग्रहण केला.

## बुच्चिरेड्डिपालेम, नेल्लूर, आंध्रप्रदेश

दि. ३० सप्टेंबर रोजी खुले सत्र व संपूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये बुच्चिरेड्डिपालेम व सिधिपुरम केंद्रातील ९६ अभ्यासी सहभागी झाले होते. ५५ इच्छुक उपस्थित असलेले खुले सत्र सत्संगानंतर सुरू झाले व दुपारपर्यंत सुरू राहिले. वक्त्यांनी आपल्या भाषणांत 'धर्म व आध्यात्मिकता', 'अध्यात्माची गरज', 'गुरुची आवश्यकता' हे विषय अंतर्भूत केले होते. त्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. दुपारी कार्यक्रमाचा रोख अभ्यासींकडे वळला व दहा सूत्रांचे महत्व व साधनेचे मूळ स्वरूप याविषयांवर चर्चा झाली.

## खामगाव, बुलढाणा जिल्हा, महाराष्ट्र

सहजमार्गाच्या सुगंधाची ओळख येथे जरी फार वर्षांपूर्वीच झाली असली तरी तो सुप्त स्वरूपात होता. केंद्रातील काही अभ्यासींना स्वत:वर काम करण्याची तसेच एकत्रितपणे काम करण्याची अंत:प्रेरणा झाल्यामुळे त्यांनी केंद्राच्या वाढीसाठी गुरुदेवांकडे मदतीची प्रार्थना केली. त्यानंतर लगेचच, ते जेथे जेथे गेले, ज्या लोकांकडे गेले त्यांनी ध्यान व आधुनिक जगातील त्याची समर्पकता याबाबत विचारणा केली तसेच सहज मार्गाबाबत अधिक जाणून घेण्याची उत्सुकता दाखवली. त्यानुसार जवळच्या केंद्रातील प्रशिक्षकाला आमंत्रित करण्यात आले व एक ते दीड दिवसाच्या अल्प कालावधीत दोन अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांकरीता, कला व विज्ञान महाविद्यालयातील शिक्षकांसाठी, हिंदुस्थान युनिलीव्हर कंपनीतील कर्मचारी यांकरीता व एक औषध विक्रेत्यांचा हॉल अशा पाच ठिकाणी खुल्या सत्रांचे आयोजन करण्यात आले. सहभागी लोकांनी तेथे हजर असलेल्या प्रशिक्षकांकडे जाऊन प्रारंभिक सिटींगसाठी वेळ घेण्यास सुरुवात केली. यावरुन त्यांचा उत्साह स्पष्टपणे दिसून येत होता.





# प्रकाशाचे केंद्र

## हारूर आश्रम, तामिळनाडू



हारूर हे तामीळनाडूच्या धर्मापूरी जिल्ह्यात वसलेले एक छोटेसे गाव आहे. सेलम, धर्मपुरि व तिरुवण्णामलै या सारख्या मोठ्या शहरांना ते राज्य-रस्त्यांनी जोडलेले आहे. जुन्या परंतु निसर्गरम्य अशा मोरप्पूर रेल्वे स्थानकापासून ते दहा कि. मी. अंतरावर आहे.



दि.२५ सप्टेंबर १९९५ रोजी वासवी महल येथे बंधू सोमकुमार यांनी संचालित केलेल्या खुल्या सत्राने या केन्द्राचा आरंभ झाला. जमलेल्या १५० लोकांपैकी १५ जणांनी त्याच दिवशी प्रारंभीचे सिटींग घेतले. इच्छुकांना प्रारंभीचे सिटींग देण्यासाठी तिरुप्पूर, सन्कगिरि व धर्मपुरि येथून प्रशिक्षक आले होते. लगेचच आक्टोबर ९५ पासून हारूर केन्द्र कार्यान्वित झाले.



तिरुप्पत्तूर मुख्य रस्त्यावर, हारूर पासून सुमारे ५ कि. मी. अंतरावर हारूर आश्रम वसलेला आहे. १९९८ मध्ये आश्रमासाठी जागेचा शोध सुरू झाला व दि. १९ एप्रिल २००० रोजी सोरियम्पट्टि येथे ५ एकर जागा खरेदी करण्यात आली व तिचे नोंदणीकरण करण्यात आले.




गुरुदेवांनी हारूर आश्रमास भेट देऊन दि. १७ फेब्रूवारी २००१ रोजी ध्यानगृहाचे उद्घाटन केले. ते तेथे दोन दिवस राहिले होते. त्यावेळी तीन हजाराहून अधिक अभ्यासी व जवळ जवळ पाचशे मुमूक्षू उपस्थित होते. आपल्या भाषणात गुरुदेवांनी 'प्रकाशाचे केंद्र' ही संकल्पना विस्ताराने विशद केली. ते पुढे म्हणाले की, "हा आश्रम खऱ्या अर्थाने प्रकाशाचे केंद्र झाला पाहिजे. एखाद्या परित्यक्त मंदिराप्रमाणे तो काळोखाचे केंद्र बनू नये. प्रकाश केव्हा येतो? जेव्हा तुम्ही काडेपेटीतील काडी घेऊन दिव्यातील वात प्रज्वलित करता तेव्हाच प्रकाश पडतो. एरव्ही केवळ काळोखच असतो. तेव्हा आपल्याला येथे आले पाहिजे व आपल्यालाच प्रकाश निर्माण केला पाहिजे. कारण प्रकाश कुठेही स्वत:हून प्रकट होत नसतो. म्हणून आपण जेव्हा येथे येऊ तेव्हा आपण शुद्ध हृदयाने आले पाहिजे. जर आपण पवित्र हृदय घेऊन आलो तर प्रकाश आपोआपच येईल, वृद्धिंगत होईल व तेजस्वी बनेल."





आश्रमामध्ये विविध वृक्षराजींनी नटलेले एक सुंदर उद्यान आहे. ते आश्रमातील शांत वातावरण अधिकच प्रसन्न करते. ध्यानगृहाचे क्षेत्र सुमारे १००० चौ. फू. असून ते एसी शीटच्या छपराने आच्छादलेले आहे. ध्यानगृहाचे बांधकाम डिसेंबर २००० मध्ये तीन महिन्यांत पूर्ण झाले. त्या शिवाय तेथे ८६४ चौ. फू. चे एक निवासीकक्षसुद्धा आहे. त्यात पुरेशा संख्येने प्रसाधनगृहे व स्नानगृहे उपलब्ध आहेत. गुरुदेवांचे कुटीर तसेच एक प्रशस्त स्वयंपाकगृह देखील तेथे आहे. त्याचबरोबर गवताने शाकारलेले छत असणारे एक शीतल व रमणीय असे भोजनगृहही या आश्रमात आहे.

दि. १६ ऑगस्ट २००७ रोजी गुरुदेवांनी ह्या आश्रमास दुसऱ्यांदा भेट दिली आणि एक सत्संग संचालित केला. हारूर आश्रमात कायम स्वरूपी ध्यानगृह बांधण्यास गुरुदेवांनी अनुमति दिली आहे.

आश्रमाशी संलग्न क्षेत्रात सात एकर जागेवर श्री चारीजी नगर गृह निर्माण वसाहत गठित करण्यात आली आहे. अभ्यासींना निवासस्थानांसाठी ९० भूखण्ड गुरुदेवांनी वितरित केले आहेत. वसाहतीस पाणी पुरवठा करण्यासाठी ३०,००० लि. क्षमतेची पाण्याची एक उंच टाकी बांधण्यात आली आहे.

गुरुदेवांच्या भेटीनंतर उत्तगरै, सिंगारपेटै, कम्बईनेल्लूर, बोम्मिडि, पाप्पिरेड्डिपट्टि, मोरप्पूर, कोटप्पट्टि या सारख्या उपकेन्द्रांचा प्रारंभ झाला. हारूर आश्रम व त्याच्या उपकेन्द्रांमधून जवळ जवळ ४०० अभ्यासी सहजमार्ग साधना करत आहेत. सहजमार्गातील गुरुदेवांचे जन्मदिवस साजरे करणे, प्रशिक्षकांच्या बैठकी व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे हे सत्संगाशिवाय इतर उपक्रम हारूर आश्रमात चालू असतात.

## उद्‌घोषणा :

### नविन नियुक्ति

डॉ. सत्या एन. मंडल,
विभाग प्रमुख, दिल्ली (**NCR**) क्षेत्र.


उपेन्द्रपाल धवन, आय.आर.एस. (निवृत्त)
संचालक, **CREST**, खरगपूर.

भगिनी रूपाली गर्ग,
उपसंचालक, **CREST**, खरगपूर.

जगदीश शरण गुप्ता,
व्यवस्थापक, लखनौ आश्रम.

उल्हासराव कुंबळे,
केन्द्रप्रमुख, हैद्राबाद केन्द्र.

श्यामजी मेहरोत्रा,
केन्द्रप्रमुख, लखनौ केन्द्र.




### जागतिक मुख्यालय, चेन्नई येथील पुराभिलेख संग्रहालय :

आपल्या मिशनचा इतिहास जतन करण्याच्या हेतूने जागतिक मुख्यालय, मणपक्कम आश्रम, चेन्नई येथील पुराभिलेख चमू, मिशनशी संबंधित ऐतिहासिक महत्वाच्या पुरातनवस्तु संकलित करून त्यांचे जतन करीत आहे. जर कोणाकडे अशा काही वस्तू (उदा. फोटो, कोणत्याही स्वरूपातील किंवा माध्यमातील श्राव्य अथवा दृक्–श्राव्य माहिती, पुस्तके, मासिके व नियतकालिके, सहजमार्ग परंपरेतील कोणत्याही गुरुदेवांनी वापरलेल्या वस्तू) उपलब्ध असतील तर अशा वस्तू मुख्यालयातील पुराभिलेख संग्रहालयास भेट म्हणून देण्याचा विचार करावा असे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे जेणेकरून अशा वस्तूंचे पुढील पिढ्यांसाठी जतन करणे शक्य होईल. पुराभिलेख चमूशी खालील पत्त्यावर संपर्क करता येईल –**whq.archives@srcm.org**

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.